ePaper


## लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, मंत्री चंद्रकांत पाटील यांचा निर्वाळा!



॥ वर्ष - 8 । अंक -178 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ॥ मंगळवार, दिनांक 7 जानेवारी 2025 ॥ पुणे आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews

### आतील पानांत

- रशीद खानची सर्वोत्कृष्ट गोलंदाजी
- रोहितचं कॉमेडीमध्ये भविष्य चांगलं
- विजापूरमध्ये नक्षलवादी हल्ला!
- गुजरातमध्ये एचएमपीवीचा रुग्ण!

## आरोग्य विभागाकडून राज्यभरात तपासणी मोहीम

# खासगी रुग्णालयांच्या मनमानीला चाप!

### रुग्णालयांकडून नियमांचे पालन होते की नाही, यासाठी जिल्हास्तरावर पथकांची नियुक्ती

। पुणे । महाईन्यूज

**राज्यात खासगी रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. यासाठी राज्यभरात जिल्हा स्तरावर पथकांची नियुक्ती करण्याचे आदेश आरोग्य विभागाने दिले आहेत. तपासणी करून आरोग्य सेवा आयुक्तांकडे अहवाल सादर करण्यात येणार असून, त्यानंतर रुग्णालयांवर कारवाई केली जाणार आहे.**




राज्यातील खासगी रुग्णालयांकडून नियमांचे पालन होते की नाही, याची तपासणी आरोग्य विभागाची पथके करणार आहेत. आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी याबाबतचा आदेश काढला आहे. या आदेशानुसार, रुग्णालयांकडून वैद्यकीय आस्थापना कायद्यासह इतर नियमांचे पालन होते का, याची तपासणी प्रामुख्याने केली जाईल. आरोग्य विभागाची पथके तपासणी करून नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांची यादी एक महिन्यात सादर करतील. याचबरोबर रुग्णालयांना सुधारणा करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला जाईल. एक महिन्यानंतर पुन्हा तपासणी करून आरोग्य सेवा आयुक्तांकडे अहवाल सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर या रुग्णालयांवर कारवाई करण्यात येईल.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नुकतीच पुण्यात आढावा बैठक घेतली. या बैठकीत खासगी रुग्णालये नियमांचे पालन करीत नसून, आरोग्य विभागालाही जुमानत नसल्याचा मुद्दा उपस्थित झाला. त्यावेळी राज्यातील खासगी रुग्णालयांची तपासणी करून कारवाई करण्याची सूचना आरोग्यमंत्र्यांनी केली होती. यानंतर आरोग्य विभागाने ही तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेची जबाबदारी प्रत्येक जिल्हा रुग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा परिषदांमधील जिल्हा आरोग्य अधिकारी, महापालिकांचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्यावर देण्यात आली आहे.

### खासगी रुग्णालये

पुणे शहर – ८५०
पिंपरी-चिंचवड – ६२५
पुणे ग्रामीण – ३५०

### आधीच्या कारवाईचे काय?

पुण्यातील मोठ्या खासगी आणि धर्मादाय रुग्णालयांकडून नियमांचे उल्लंघन झाल्याचे २०२३ मध्ये आरोग्य विभागाने केलेल्या तपासणीत समोर आले होते. या प्रकरणी रुग्णालयांना नोटिसा बजाविण्यात आल्या होत्या. त्यानंतर अद्यापपर्यंत या प्रकरणी कारवाई झालेली नाही. आरोग्य विभागाच्या नोटिसांना किती रुग्णालयांनी उत्तर दिले याची माहितीही आरोग्य विभागाने जाहीर केलेली नाही. याचबरोबर नोटिसा दिल्यानंतर पुन्हा तपासणीसाठी मनुष्यबळ नसल्याचे कारण आरोग्य विभागाचे अधिकारी सातत्याने देत आले आहेत.

### तपासणी नेमकी कशाची?

- खासगी रुग्णालयांनी दर्शनी भागात दरसूची लावली आहे का?
- जैववैद्यकीय कचरा विल्हेवाट सुविधा सुरू आहे का?
- अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र आहे का?

## पिंपरी-चिंचवडमधील गुन्ह्यात घट

### गतवर्षीपेक्षा 568 ने घटले गुन्हे, वर्षभरात 16 हजार गुन्ह्यांची नोंद

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पोलीस आयुक्तालय हद्दीतील गुन्ह्यात घट झाली आहे आयुक्तालयांतर्गत २३ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सन २०२३मध्ये १६ हजार ४७७ गुन्ह्यांची नोंद झाली होती २०२४ मध्ये ५६८ ने गुन्ह्यात घट झाल्याची माहिती पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिली.**




पिंपरी : पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील गुन्ह्यात घट झाली आहे. आयुक्तालयांतर्गत २३ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सन २०२३मध्ये १६ हजार ४७७ गुन्ह्यांची नोंद झाली होती. तर, मागील वर्षभरात (२०२४) खून, दरोडा, चोऱ्या, लुटमार, फसवणूक, वाहन चोरी, बलात्कार, विनयभंग अशा १५ हजार ९०९ गुन्ह्यांची नोंद झाली. सन २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये ५६८ ने गुन्ह्यात घट झाल्याची माहिती पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत पिंपरी, निगडी, चिंचवड, भोसरी, एमआयडीसी-भोसरी, सांगवी, हिंजवडी, वाकड, दिघी, चिखली, चाकण, आळंदी, देहूरोड, तळेगाव – दाभाडे, तळेगाव एमआयडीसी, शिरगाव, रावेत, म्हाळुंगे आणि नव्याने निर्माण झालेल्या काळेवाडी, बावधन, दापोडी, संत तुकारामनगर आणि सायबर सेल अशा २३ पोलीस ठाण्यांचा समावेश आहे.

### का घटले गुन्हे?

मागील वर्षभरात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमांतर्गत (मोक्का) ९९ टोळ्यांमधील ६०० गुंडांना अटक केली. ५५५ गुन्हेगारांना तडीपार करून ४७ संशयितांवर स्थानबद्धतेची कारवाई केली. वाहनचोरीच्या घटना रोखण्यासाठी ज्या ठिकाणी वाहनचोरीचे प्रमाण जास्त आहे अशा ठिकाणी कर्मचाऱ्यांची गस्त वाढवली. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यावर भर दिला. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत वाहनचोरीच्या गुन्ह्यातही ८९ ने घट झाली. पोलिसांनी राबवलेल्या विविध उपाययोजनांमुळे आयुक्तालय हद्दीतील गुन्ह्यांमध्ये तब्बल ५६८ ने घट झाल्याचे दिसून आले.

आयुक्तालय हद्दीतील दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, वाहनचोरी अशा गंभीर गुन्ह्यांच्या संख्येत घट झाली आहे. बालगुन्हेगारी रोखण्यासाठी सर्व बालगुन्हेगारांची माहिती संकलित करून दिशा उपक्रमांतर्गत गुन्हेगारीतून त्यांचे लक्ष विचलित करून त्यांना खेळाकडे आकर्षित केले असल्याचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सांगितले.

# मनोज जरांगे विरोधात गुन्हा दाखल करा

## शिवाजीनगर पोलीस ठाण्याबाहेर आंदोलकांची मागणी

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**परभणीतील मूक मोर्चादरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात वादग्रस्त विधान केले. या विधानाच्या निषेधार्थ राज्यभरात ओबीसी समाजाकडून ठिकठिकाणी आंदोलन करण्यात येत आहे. तसेच, मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणीही आंदोलकांकडून करण्यात येत आहे. त्याचदरम्यान काल परळी शहर पोलीस ठाण्यात मनोज जरांगे पाटील यांच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरुद्ध मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी परभणीतील मूक मोर्चा दरम्यान काढलेल्या विधानावरून त्यांच्यावर परळी शहर पोलीस ठाण्यात रविवारी सायंकाळी अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी तुकाराम बाबूराव अघाव यांनी तक्रार दिली आहे. दरम्यान, परळी पोलीस ठाण्यासमोर ओबीसी समाजाच्या वतीने धनंजय मुंडे यांच्या विरोधात करण्यात येणाऱ्या विधानांवरून दुपारच्या वेळी जोरदार निदर्शने करण्यात आली. मनोज जरांगे, अंजली दमानिया व सुरेश धस यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, अशा घोषणा देण्यात आल्या. अशीच काही आंदोलने बीड जिल्ह्यातील अन्य काही शहरांमध्ये करण्यात आली. या सर्व घडामोडींदरम्यान आज पुण्यातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याबाहेर मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी ओबीसी समाजाचे नेते बाळासाहेब सानप, मंगेश ससाणे यांनी कार्यकर्त्यांसह ठिय्या आंदोलन केले. यावेळी बाळासाहेब सानप म्हणाले की, सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा राज्यातील ओबीसी समाज निषेध व्यक्त करीत आहे. या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी आमची मागणी आहे. पण, काही दिवसांपासून राज्यभरात मोर्चे काढून, एका समाजाला लक्ष्य केले जात आहे. हे योग्य नसून, दोन दिवसांपूर्वी परभणी येथील मोर्चादरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी घरात घुसण्याची भाषा वापरली आहे. त्यामुळे तुम्ही कोणाच्या घरात घुसणार आहात आणि घरात घुसून काय करणार आहात, याबाबत उत्तर द्या. तुमच्या या विधानामुळे महाराष्ट्र पेटला आहे. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एकच विनंती आहे की, आपल्या राज्यात कोणी जर अशा प्रकारचे विधान करीत असेल आणि राज्यात हिंसाचार घडवू पाहत असेल, तर अशा व्यक्तीवर बंधन आणले पाहिजे, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.याप्रकरणी तुकाराम बाबूराव अघाव यांनी तक्रार दिली आहे. दरम्यान, परळी पोलीस ठाण्यासमोर ओबीसी समाजाच्या वतीने धनंजय मुंडे यांच्या विरोधात करण्यात येणाऱ्या विधानांवरून दुपारच्या वेळी जोरदार निदर्शने करण्यात आली. मनोज जरांगे, अंजली दमानिया व सुरेश धस यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, अशा घोषणा देण्यात आल्या.

### या विधानामुळे महाराष्ट्र पेटला

अशीच काही आंदोलने बीड जिल्ह्यातील अन्य काही शहरांमध्ये करण्यात आली.या सर्व घडामोडींदरम्यान आज पुण्यातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याबाहेर मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी ओबीसी समाजाचे नेते बाळासाहेब सानप, मंगेश ससाणे यांनी कार्यकर्त्यांसह ठिय्या आंदोलन केले. यावेळी बाळासाहेब सानप म्हणाले की, सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा राज्यातील ओबीसी समाज निषेध व्यक्त करीत आहे. या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी आमची मागणी आहे. पण, काही दिवसांपासून राज्यभरात मोर्चे काढून, एका समाजाला लक्ष्य केले जात आहे. हे योग्य नसून, दोन दिवसांपूर्वी परभणी येथील मोर्चादरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी घरात घुसण्याची भाषा वापरली आहे. त्यामुळे तुम्ही कोणाच्या घरात घुसणार आहात आणि घरात घुसून काय करणार आहात, याबाबत उत्तर द्या. तुमच्या या विधानामुळे महाराष्ट्र पेटला आहे.

---

# ‘वस्त्रकला’ मध्ये ‘पैठणी’ महोत्सवाचे आयोजन

## शहरात महिलांसाठी प्रथमच पैठणी खरेदीची सुवर्ण संधी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड स्टेशन जवळील वस्त्र कला या महिलांसाठी सुसज्ज असे साडी दालन आहे. या साडी दालनात पैठणी, वेस्टर्न, पारंपरिक पद्धतीच्या विविध प्रकारच्या अनेक साड्या एकाच छताखाली मिळतात.**



वस्त्र कला मध्ये नुकताच पैठणी महोत्सवाचा शुभारंभ सारीकाताई सुनील (अण्णा) शेळके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आमदार उमा ताई खापरे, माजी महापौर मंगलताई कदम, माजी नगरसेविका सुलभा ताई उबाळे, अनुराधाताई गोरखे, कमलताई घोलप, शर्मिलाताई बाबर, नंदाताई ताकवणे, सुवर्णाताई भोईर, कविताताई मोरे, संचिता जगताप आदी उपस्थित होत्या. पैठणी महोत्सवात येवला पैठणी, मुनिया पैठणी, गंधर्व पैठणी, बांगडी मोट पैठणी, बिशवबाही पैठणी, कस्तूरी पैठणी, बालगंधर्व पैठणी, महाराणी पैठण, कलांजली पैठणी, चंद्रकोर पैठणी, नथ बुटदा पैठणी, बॉंकेर पैठणी, ऑलओव्हर पैठणी, बल्फ ऑल ओव्हर पैठणी, गडवाल पैठणी, मिनाकारी पैठणी, कलमकारी पैठणी, लोटस ब्रॅड काठ पैठणी आदी पैठणीचे प्रकार उपलब्ध आहेत. साड्यांचा उत्कृष्ट दर्जा, योग्य व माफक दर, चांगल्या सुविधा यामुळे ‘वस्त्र कला’ ने अल्पावधीतच महिलांच्या मनात आपुलकी निर्माण केली आहे. पैठणी महोत्सवाला महिलांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

### महिलांचा भरभरून प्रतिसाद

पैठणी महोत्सवात येवला पैठणी, मुनिया पैठणी, गंधर्व पैठणी, बांगडी मोट पैठणी, बिशवबाही पैठणी, कस्तूरी पैठणी, बालगंधर्व पैठणी, महाराणी पैठण,बल्फ ऑल ओव्हर पैठणी, गडवाल पैठणी, मिनाकारी पैठणी, कलमकारी पैठणी, लोटस ब्रॅड काठ पैठणी आदी पैठणीचे प्रकार उपलब्ध आहेत.या साडी दालनात पैठणी, वेस्टर्न, पारंपरिक पद्धतीच्या विविध प्रकारच्या अनेक साड्या एकाच छताखाली मिळतात. साड्यांचा उत्कृष्ट दर्जा, योग्य व माफक दर, चांगल्या सुविधा यामुळे ‘वस्त्र कला’ ने अल्पावधीतच महिलांच्या मनात आपुलकी निर्माण केली आहे. पैठणी महोत्सवाला महिलांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

## पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते पिंपरी मार्गिकेचा भक्तीशक्ती चौकापर्यंत विस्तार

# निगडीपर्यंत मेट्रोमुळे वाढणार कनेक्टिव्हिटी!

### चिंचवड, आकुर्डी, निगडी स्थानके; तळवडे, किवळे, मामुर्डी, रावेतच्या प्रवाशांची सोय

।पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते पिंपरी (पीसीएमसी) मार्गिकेचा निगडीतील भक्तीशक्ती चौकापर्यंत विस्तार केला जाणार आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. यामुळे मुंबई-पुणे महामार्गाच्या परिसरातील चिंचवड, आकुर्डी, निगडी या गावांसह चिखली, तळवडे, संभाजीनगर, शाहूनगर, यमुनानगर, प्राधिकरण, रावेत, किवळे, मामुर्डी या गावांचीही कनेक्टिव्हिटी वाढणार आहे.**





पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील पुणे मेट्रोच्या दोन मार्गांवर प्रवासी सेवा सुरू झाली आहे. स्वारगेट ते पिंपरी (पिंपरी-चिंचवड महापालिका भवन - पीसीएमसी) आणि पुण्यातील वनाज ते रामवाडी असे हे दोन मार्ग आहेत. या दोन्ही मार्गांवर प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे.

त्यामुळे पिंपरी, चिंचवड, भोसरी, पूर्णानगर, मोरवाडी, नेहरूनगर, संत तुकारामनगर, पिंपळे सौदागर, सांगवी, दापोडी, कासारवाडी, फुगेवाडी, काळेवाडी, जाधववाडी, मोशी आदी भागातील नागरिकांना पुण्यात जाणे सोयीचे झाले आहे. या भागांना जोडण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) मेट्रो स्थानकांशी जोडणारी बससेवा सुरू केली आहे.

काही जण स्वतःच्या दुचाकीने किंवा रिक्षाने मेट्रो स्थानकांपर्यंत येऊन पुढील प्रवास मेट्रोने करत आहेत. त्यामुळे शहरातील पिंपरी, संत तुकारामनगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी स्थानकांवर प्रवाशांची संख्या वाढू लागली आहे. कारण, पुणे न्यायालय स्थानकावर उतरून कोथरूड, कर्वेनगर, वनाज आणि पुणे स्टेशन, येरवडा, रामवाडी भागात जाणे सहज सोपे झाले आहे.

आता या स्वारगेट-पिंपरी मार्गिकेचा विस्तार निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत केला जाणार आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. पुढील दोन वर्षात प्रवासी सेवा सुरू होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे शहराच्या उर्वरित भागातील विशेषतः मुंबई-पुणे महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या गावांची कनेक्टिव्हिटी मेट्रोने वाढणार आहे. शिवाय, हे दोन्ही बाजूंची गावेही पीएमपीने मेट्रो स्थानकाशी जोडली जाणार आहेत.

### पिंपरी स्थानकाशी किवळे 'कनेक्ट'

शहराच्या उत्तरेकडील शेवटचे टोक म्हणजे किवळे व मामुर्डी ही गावे आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका भवनापासून (पिंपरी मेट्रो स्थानक) साधारण १२ ते १५ किलोमीटरवर ही गावे आहेत. ती आता किवळेतील मुकाई चौकापासून पिंपरी मेट्रो स्थानकाशी पीएमपीने जोडली गेली आहेत. अर्थात पिंपरी मेट्रो स्थानक ते मुकाई चौक किवळे अशी बससेवा पीएमपीने सुरू केली आहे.

### पिंपरी ते निगडी मेट्रो

**अंतर - ४.४१३ किलोमीटर**
**स्थानके - चिंचवड स्टेशन (महावीर व अहिंसा चौक), आकुर्डी (खंडोबा माळ चौक), निगडी (टिळक चौक व भक्ती-शक्ती चौक)**

"निगडीपर्यंत मेट्रो आल्यामुळे तळवडे, रुपीनगर, त्रिवेणीनगर भागातून पुण्यात जाणाऱ्यांची सोय होईल. शिवाय, पीएमपीच्या तुलनेने प्रवास जलद होईल. नोकरदार व विद्यार्थ्यांसह अन्य प्रवाशांनाही मेट्रो सोयीची होईल. वाहतूक कोंडीत न अडकता इच्छित ठिकाणी वेळेत पोहोचता येईल.

-पूनम डिंगोरे, नोकरदार, त्रिवेणीनगर, निगडी

---

## अबॅकस आणि वैदिक गणित स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद!

### मास्टर माईंड ग्लोबल स्कूलतर्फे आयोजन : विविध 25 शाळांमधून 600 विद्यार्थ्यांचा सहभाग

।पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज भोसरी येथे ७ वी राष्ट्रीय स्तरावरील अॅबॅकस आणि वैदिक गणित स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला शहर परिसरातील 25 शाळांनी सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शवला. यावेळी या स्पर्धेमध्ये सहाशेहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.**



क्रिएटिव्ह कॅलिबर माइंड्स द्वारे मास्टरमाईंड ग्लोबल स्कूल येथे राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.स्पर्धेत विविध शहरांमधील विद्यार्थी तसेच विभागातील २५ हुन अधिक शाळांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेचे मूल्यमापन वयोगट आणि स्तरानुसार वेगवेगळ्या गटामध्ये केले जाते.त्याप्रमाणे स्पर्धेत ६०० हुन अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेतील विजेत्यांसाठी बक्षीस वितरण समारंभ अंकुशराव नाट्यगृह येथे 5 जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्ञानभक्ती स्कूलच्या प्राचार्या नीतू अरोरा तसेच मास्टर माईंड स्कूलच्या प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर आणि

### मुच्छाल यांचे मार्गदर्शन...

विजेत्या आणि सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, पदके, ट्रॉफी आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर आणि क्रिएटिव्ह कॅलिबर माईंडच्या अध्यक्षा कांचन मुच्छाल यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली.



भूमिका

# विदा कायदा नागरिकांना सक्षम करेल

**आपण जागतिक भविष्याबद्दल बोलतो, तेव्हा ते बोलणे, ती चर्चा प्राधान्याने मानव केंद्रित दृष्टिकोन बाळगूनच व्हायला हवी, हे शब्द आहेत आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे. अलिकडेच झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या भविष्याविषयीच्या शिखर परिषदेत अर्थात 'समिट ऑफ द फ्यूचर' ला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगाला हा विचार.**



नुकत्याच आखण्यात आलेल्या डिजिटल वैयक्तिक विदा संरक्षण नियम, २०२५च्या मसुद्याला आकार देण्याच्या प्रयत्नांमध्येही हेच तत्त्वज्ञान मार्गदर्शक ठरले आहे. या नियमांवर मान्यतेची अंतिम मोहर उमटल्यानंतर डिजिटल वैयक्तिक विदा संरक्षण कायदा २०२३ प्रत्यक्षात लागू होईल आणि नागरिकांच्या वैयक्तिक विदा संरक्षणाच्या अधिकाराचे रक्षण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेलादेखील खऱ्या अर्थाने मूर्त स्वरूप प्राप्त होईल. प्रत्येक भारतीय नागरिकाला केंद्रस्थानी ठेवूनच डिजिटल वैय्यक्तिक विदा संरक्षण नियम, २०२५ ची आखणी करण्यात आली आहे. खरे तर आजच्या जगात माहिती साठ्याचे महत्व, त्याचे वर्चस्व सातत्याने आणि वेगाने वाढत चालले आहे. अशा वेळी प्रत्येक व्यक्ती शासनाच्या प्रत्येक धोरणात्मक आराखड्याच्या केंद्रस्थानी असणे अत्यावश्यक आहे, हीच दृढ धारणा बाळगून सरकार काम करत आहे. या तत्त्वाला अनुसरूनच हे नियम आखण्यात आले आहेत आणि त्यामुळेच या नियमांच्या माध्यमातून नागरिकांना माहितीपूर्ण संमती, माहिती हटवणे आणि डिजिटल वारसदार / नामनिर्देशित व्यक्ती नियुक्त करण्याचे अधिकार या आणि यांसारख्या अधिकारांचे बळ देऊन, अधिक सक्षम केले जाईल. नियमांचे उल्लंघन होत असल्याची किंवा आपल्या विदेचा विनापरवानगी अथवा अनधिकृतपणे वापर होत असल्याची शंका आल्यास नागरिकांना हतबल झाल्यासारखे वाटणार नाही, कारण आता त्यांच्याकडे त्यांची डिजिटल ओळख प्रभावीपणे संरक्षित आणि व्यवस्थापित करण्यासाठी मजबूत साधने उपलब्ध असतील. प्रत्येकाला हे नियम सहज सोप्या रितीने समजतील, प्रत्येक बाबतीत स्पष्टता असेल, नागरिक सहजतेने आपल्या अधिकारांचा वापर करू शकतील अशी काळजी घेऊनच हे नियम आखले गेले आहेत. त्यामुळेच तर या नियमांअंतर्गत नागरिकांकडून स्पष्ट आणि समजणाऱ्या शब्दांत त्यांची संमती मागितली जावी इथपासून ते नागरिकांना इंग्रजी किंवा राज्यघटनेत सूचिबद्ध २२ भारतीय भाषांपैकी कोणत्याही भाषेत माहिती पुरविणे बंधनकारक करण्यापर्यंतच्या नियमांचा अंतर्भाव केला गेला आहे. एका अर्थाने या नियमांची ही चौकट म्हणजे सर्वसमावेशकतेप्रतीच्या बांधिलकीचेच प्रतीक आहे. खरे तर आजच्या या डिजिटल युगात मुलांची विशेष काळजी घेण्याची गरज कोणीही नाकारू शकत नाही. हे नियम आखताना याची काटेकोर काळजी घेतली आहे. या नियमांमध्ये अल्पवयीन मुलांच्या वैयक्तिक माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी त्याकरता त्यांचे पालक किंवा पालकत्व घेतलेल्या व्यक्तीची संमती घेऊन, तशी पडताळणी करून पाहणे बंधनकारक करण्यात आले आहे. याद्दष्टीने या नियमांमध्ये ज्या अतिरिक्त सुरक्षा उपायांची तरतूद केली आहे, त्यातून मुलांचे शोषण, अनधिकृत प्रोफाइलिंग, इतर डिजिटल जोखीमा आणि हानीपासून मुले संरक्षित राहतील याची खात्री करून घेण्यात आली आहे. या तरतुदींच्या माध्यमातून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित डिजिटल अवकाशाची निर्मिती करण्याचा प्रयत्न आहे.आजच्या घडीला भारताची डिजिटल अर्थव्यवस्था ही जागतिक यशोगाथा ठरली आहे आणि ही गती कायम तशीच राखण्यासाठी सरकार निर्धारपूर्वक वाटचाल करत आहे. त्याअनुषंगाने आखलेल्या या नियमांच्या आराखड्यातून नागरिकांना त्यांचा वैयक्तिक माहितीसाठा सुरक्षित असल्याची हमी मिळेल आणि त्याचवेळी डिजिटल अर्थव्यवस्थेतदेखील नवोन्मेषाचा नवा मार्ग सापडेल, याची खात्री आम्ही केली आहे.

## प्रासंगिक »

# वाल्मीकी वाल्या!

***प्रश्न संबंधित कुटुंबीयांना न्याय मिळतो की नाही इतकाच नाही, तर प्रशासकीयदृष्ट्या निरोगी मानल्या जाणाऱ्या या राज्याची इभ्रत राहणार की नाही, हादेखील आहे.***

बिहारमध्ये; असा प्रश्न पडावा अशा बीड या मराठवाड्यातील तुलनेने मागास जिल्ह्याचे वास्तव दर्शवणारी वृत्तमालिका 'लोकसत्ता'त गेले तीन दिवस प्रसिद्ध झाली. तिने अनेकांच्या जाणिवांस धक्का दिला असेल. "आपले ठेवावे झाकून, इतरांचे पाहावे वाकून" या मानसिकतेतील मराठीजन बिहार, उत्तर प्रदेश आदी गोपट्ट्यातील बाहुबलींच्या नावे नाके मुरडतात. महाराष्ट्रात सर्व श्रावणबाळच जणू ! अशा वेळी आपले वास्तव समोर मांडणे गरजेचे होते. ते कर्तव्य 'लोकसत्ता'ने पार पाडले. बीड जिल्ह्यास बिहारीकरणाच्या दिशेने लोटण्याचे श्रेय नि:संशय गोपीनाथ मुंडे यांचे.परंतु पुढे व्यापक प्रादेशिक हिताकडे सोयिस्कर दुर्लक्ष करून आपल्या जातीजमातीची गुंडपुंडशाही चालवतो आणि जातीचाच हिशेब करत अन्य त्याकडे काणाडोळा करतात. हे भयानक आहे.

बाळशास्त्री जांभेकर यांनी वयाच्या २० व्या वर्षी सहा जानेवारी १८३२ ला "दर्पण" नावाचे मराठीतील पहिले नियतकालिक सुरू केले. त्यांच स्मरण म्हणून सहा जानेवारी राज्यात 'पत्रकार दिवस' म्हणून साजरा केला जातो. विधवा पुनर्विवाहाचा प्रश्न आणि अन्य सामाजिक सुधारण्याच्या प्रश्नांना त्यांनी महत्व दिलेलं होतं.

# सत्तेला प्रश्न विचारताना जीव धोक्यात घातला...

आजच्या पत्रकारितेचा विचार करणे आवश्यक आहे.बातम्यांच्या व्यवसायात दरवर्षी अनेक पत्रकारांची हत्या केली जाते किंवा ते मारले जातात. अनेकांना तुरुंगात टाकण्यात येतं. ग्रामीण भागात पत्रकारिता करणाऱ्यांसाठी राजकीय नेत्यांच्या विरोधात बातम्या देणं सोप नसतं. मात्र सगळेजण दबावाला बळी पडत नाही. वस्तुनिष्ठ बातम्या देणारे पत्रकार अनेकांसाठी अडचणीचे असतात. हा काळ माहितीचा असल्यामुळे युद्धाची किंवा इतर महत्वाची बातमी लवकरात लवकर वाचक, प्रेक्षकांकडे पोहचविण्याचीही स्पर्धा असते. काहीवेळा युद्धाचं वृत्तांकन करताना पत्रकार मारले जातात.लष्कराकडे सत्ता असलेल्या देशात किंवा हुकूमशाही असलेल्या देशात किंवा धर्म आधारित देशात वस्तुनिष्ठ पत्रकारिता जवळपास नसते.अश्या देशात वस्तुनिष्ठ पत्रकारिता करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पत्रकारांची सर्वात जास्त हत्या केली जाते किंवा त्यांना तुरुंगात टाकलं जातं. गेल्या





वर्षी जगात १४ महिलांसह किमान १२२ पत्रकारांची हत्या करण्यात आली किंवा ते मारले गेले. पश्चिम आशियात इस्रायल-पॅलेस्टाईनमध्ये युद्ध सुरू आहे. दुसरीकडे, रशिया-युक्रेनमध्येही २०२२ च्या २४ फेब्रुवारीपासून युद्ध सुरू आहे.

या युद्धाच्या बातम्या देतानाही काही पत्रकार मारले गेले आहेत. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ जर्नालिस्टस, कमिटी फॉर द प्रोटेक्शन ऑफ जर्नालिस्टस सारख्या संघटना जगभरात पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांची सविस्तर माहिती गोळा करतात. फेडरेशनच्या म्हणण्यानुसार गेल्या वर्षी पश्चिम आशिया आणि अरब राष्ट्रात सर्वात अधिक पत्रकार मारले गेले. पत्रकारांसाठी युरोप सगळ्यात सुरक्षित असल्याचे आकडेवारीतून दिसतं. गेल्या वर्षी पश्चिम आशियात एकूण ७७ पत्रकार मारले गेले.. त्यात इस्त्रायल- पॅलेस्टियन युद्धात ६४ पॅलेस्टियन पत्रकार मारले गेले. २३ ऑगस्टला दोन महिलांसह तीन पत्रकार इराक येथे मारले गेले.१९ डिसेंबरला दोन कुर्दीश पत्रकार उत्तर सीरियात मारले गेले. जगभरात मारले गेलेल्या किंवा हत्या करण्यात आलेल्या पत्रकारांपैकी ५५ टक्क्यांहून अधिक पत्रकार पश्चिम आशियातील होते. गाझाची परिस्थिती अतिशय वाईट आहे. आशिया खंडात २२ पत्रकार मारले गेले किंवा त्यांची हत्या करण्यात आली. त्यात सर्वात जास्त पाकिस्तानात (७), बांगलादेशात (५), भारत आणि म्यानमारात ३-३ पत्रकाराची हत्या करण्यात आली आहे. आफ्रिकेत १० पत्रकार मारले गेले आहेत. त्यात सर्वात जास्त ६ सुदान येथे मारले गेले. लष्करातील दोन जनरल यांच्या गटामध्ये २०२३ पासून सुरू झालेला संघर्ष थांबण्याची चिन्ह दिसतं नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# एचएमपीव्हीमुळे घाबरुन जाऊ नका!

## कपोलकल्पित माहितीवर विश्वास ठेवू नका : मुख्यमंत्री

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**व्हायरसने चीनमध्ये सध्या मानवी मेटान्यूमोव्हायरसचा (एचएमपीव्ही) उद्रेक सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर देशात देखील खबरदारी घेतली जात आहे. यादरम्यान इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) नेटवर्क लॅबोरेटरीजच्या नियमीत तपासणीदरम्यान किमान दोन एचएमपीव्हीचे रूग्ण आढळून आले आहेत. या दरम्यान या संसर्गासंबंधी केंद्र सरकारने काही महत्त्वाची माहिती दिली आहे.**



भारतातील या व्हायरससंबंधी परिस्थितीबद्दल माहिती देताना केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने निवेदन जारी केले आहे. ज्यामध्ये एचएमपीव्ही भारतासह जागतिक स्तरावर आधीपासूनच प्रसारित झाला आहे आणि विविध देशांमध्ये एचएमपीव्हीशी संबंधित श्वसन आजारांची प्रकरणे नोंदवली गेली आहेत अशी माहिती देण्यात आली आहे. या संक्रमणावर लक्ष ठेवले जात असताना भारतातही याची दोन प्रकरणे आढळून आली आहेत. या दोनही रुग्णांनी कुठलाही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही, म्हणजेच भारतात आढळलेल्या संक्रमणांचा चीनमधील संसर्गाच्या वाढलेल्या प्रकरणाशी काहीही संबंध नाही, असेही या निवेदनात सांगण्यात आले आहे. दरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या व्हायरसमुळे घाबरु नका असं आवाहन केलं आहे.HMPV या व्हायरसला घाबरण्याचं कारण नाही. प्राथमिक माहितीनुसार हा व्हायरस नवीन नाही, यापूर्वीही हा व्हायरस आला आहे. पुन्हा एकदा या व्हायरसचा चंचूप्रवेश होताना दिसतो आहे. यासंदर्भात जी नियमावली आहे ती जाहीर होईल. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने राज्यांना माहिती देण्याचं ठरवलं आहे. या व्हायरसला घाबरुन जाण्याची आवश्यकता नाही. या संदर्भातल कपोलकल्पित माहिती देऊ नका. जी अधिकृत माहिती येईल ती माहितीच द्यावी. आरोग्य विभागाची बैठक झाली आहे, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाबरोबर बैठक चालू आहे, असं सांगितलं आहे.ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) सामान्य सर्दी आणि कोरोना व्हायरससारखी लक्षणे दर्शविते. त्यामध्ये खोकला, ताप व सर्दी यांसारख्या लक्षणांचा समावेश आहे. कोविड-१९ नंतर पाच वर्षांनंतर ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही)चा प्रादुर्भाव चीनच्या अनेक भागांमध्ये वाढत आहे, ज्यामुळे अधिकारी चिंतेत आहेत. परिणामी, अधिकारी लोकांना मास्क घालणे आणि वारंवार हात धुणे यांसारखी खबरदारी घेण्याचे आवाहन करीत आहेत.ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) हा आरएनए विषाणू आहे, जो न्यूमोव्हिरिडे कुटुंबातील मेटाप्युमोव्हायरस वंशातील आहे. २००१ मध्ये डच संशोधकांनी सर्वात पहिल्यांदा याचा शोध लावला होता. हा विषाणू श्वसन संक्रमणास कारणीभूत ठरतो. मुलांच्या नमुन्यांचा अभ्यास करताना या विषाणूचा शोध लागला होता. संशोधन असे सूचित करते की, हा विषाणू किमान सहा दशकांपासून प्रसारित आहे आणि आता जागतिक स्तरावर प्रचलित श्वसन रोगजनक म्हणून ओळखला जातो. एचएमपीव्ही प्रामुख्याने खोकताना आणि शिंकताना बाहेर काढलेल्या श्वसनाच्या थेंबांद्वारे पसरतो.भारतातील या व्हायरससंबंधी परिस्थितीबद्दल माहिती देताना केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने निवेदन जारी केले आहे. ज्यामध्ये एचएमपीव्ही भारतासह जागतिक स्तरावर आधीपासूनच प्रसारित झाला आहे आणि विविध देशांमध्ये एचएमपीव्हीशी संबंधित श्वसन आजारांची प्रकरणे नोंदवली गेली आहेत अशी माहिती देण्यात आली आहे. या संक्रमणावर लक्ष ठेवले जात असताना भारतातही याची दोन प्रकरणे आढळून आली आहेत. या दोनही रुग्णांनी कुठलाही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही, म्हणजेच भारतात आढळलेल्या संक्रमणांचा चीनमधील संसर्गाच्या वाढलेल्या प्रकरणाशी काहीही संबंध नाही, असेही या निवेदनात सांगण्यात आले आहे. दरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या व्हायरसमुळे घाबरु नका असं आवाहन केलं आहे.HMPV या व्हायरसला घाबरण्याचं कारण नाही. प्राथमिक माहितीनुसार हा व्हायरस नवीन नाही, यापूर्वीही हा व्हायरस आला आहे.

### पाच वर्षांनंतर ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस

पुन्हा एकदा या व्हायरसचा चंचूप्रवेश होताना दिसतो आहे. यासंदर्भात जी नियमावली आहे ती जाहीर होईल. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने राज्यांना माहिती देण्याचं ठरवलं आहे. या व्हायरसला घाबरुन जाण्याची आवश्यकता नाही. या संदर्भातल कपोलकल्पित माहिती देऊ नका. जी अधिकृत माहिती येईल ती माहितीच द्यावी. आरोग्य विभागाची बैठक झाली आहे, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाबरोबर बैठक चालू आहे, असं सांगितलं आहे. ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) सामान्य सर्दी आणि कोरोना व्हायरससारखी लक्षणे दर्शविते. त्यामध्ये खोकला, ताप व सर्दी यांसारख्या लक्षणांचा समावेश आहे. कोविड-१९ नंतर पाच वर्षांनंतर ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही)चा प्रादुर्भाव चीनच्या अनेक भागांमध्ये वाढत आहे, ज्यामुळे अधिकारी चिंतेत आहेत. परिणामी, अधिकारी लोकांना मास्क घालणे आणि वारंवार हात धुणे यांसारखी खबरदारी घेण्याचे आवाहन करीत आहेत.ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) हा आरएनए विषाणू आहे, जो न्यूमोव्हिरिडे कुटुंबातील मेटाप्युमोव्हायरस वंशातील आहे.

# धनंजय मुंडे, वाल्मीक कराडचे अनेक ठिकाणी भूखंड!

## 1 हजार कोटींची मालमत्ता: सुरेश धस यांचे गौप्यस्फोट

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भाजप आमदार सुरेश धस यांनी आज 'टीव्ही 9 मराठी'ला विशेष मुलाखत दिली. या मुलाखतीत सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे आणि त्यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांच्याबाबत धक्कादायक गौप्यस्फोट केले.**



सरपंच हत्या प्रकरणातील आका हे वाल्मिक कराड आहेत. तर आकाचे आका हे धनंजय मुंडे हे आहेत, असं वक्तव्य सुरेश धस यांनी केलं. कुठेही विचारलं, 45 एकर जमीन वाल्मिक कराडची आहे. अमूकतमूक ठिकाणी 50 एकर, बार्शी तालुक्यात 45 एकर, सोनपेठ तालुक्यात एका ठिकाणी 45 एकर, दुसरीकडे 50 एकर जमीन, शिरसी, तालुरा माजलगाव इथे 45 ते 50 एकर, आता मांजरसुंबा म्हणून गाव आहे तिथे 45 एकर दुसऱ्या पत्नीच्या नावावर जमीन आहे. तुमच्या जमिनी कुठे-कुठे आहेत?, असा दावा सुरेश धस यांनी केला. पुण्यात मगरपट्टा सिटी तिथे शेजारी नवीन इमारत आहे. हे पैसे कुणाचे आहेत? धनंजय मुंडे यांचे पैसे नाहीत तर कुणाचे आहेत? आमच्या इकडे बऱ्याच प्रॉपर्टीमध्ये जैन मल्टिस्टेटची चौकशी सुरु आहे. त्यात बहुतांश प्रॉपर्टीमध्ये धनंजय मुंडे यांच्या सौभाग्यवती आणि वाल्मिक कराड यांची नावे संयुक्तपणे आहेत. मी तशी एसीबीमध्ये सुद्धा चौकशी करणार आहे, असं सुरेश धस यांनी सांगितलं. अदाणी आणि अंबानी सुद्धा वापरत नसतील तेवढे मोबाईल ते वापरत आहेत. मी अंबानी यांना विचारायला जाणार आहे की, तुम्ही किती मोबाईल वापरता? किंवा नीता ताईंना जावून विचारतो.

### शासकीय बंगल्यात ही बैठक झाली

अंबानी यांचे कुणी पीए असतील, आता रतन टाटा यांच्या चिरंजीवांना जावून नतमस्तक होवून विचारतो की, तुम्ही किती मोबाईल वापरता? कारण आमचे वाल्मिक आण्णा 17 मोबाईल वापरतात. त्यांचे 100 बँक अकाउंट सापडले आहेत. त्या अकाउंटमध्ये 1000 कोटी पक्षा जास्त पैसे असतील, असा मोठा दावा सुरेश धस यांनी केला. 14 जूनला आणि 29 जूनला कुठे बैठक झाली, संतोषच्या हत्येची सुरुवात जून महिन्यात झाली. त्याच्या प्रमुख बैठकीला धनंजय मुंडे होते. धनंजय मुंडे यांचा सातपुडा हा शासकीय बंगला आहे. मी काल स्टेटमेंट केलं, शासकीय बंगल्यात ही बैठक झाली.

# गुजरातमध्ये सापडला एचएमपीवीचा रुग्ण!

## कर्नाटकामध्ये व्हायरसची लागण झालेले 2 रुग्ण आढळले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चीनमध्ये मोठ्या प्रमाणात पसरत असलेल्या एचएमपीवी व्हायरसचा शिरकाव आता भारतामध्येही झाला आहे. कर्नाटकामध्ये या व्हायरसची लागण झालेले 2 रुग्ण समोर आल्यानंतर आता गुजरातमध्ये तिसरा रुग्ण सापडला आहे. अहमदाबाद सिव्हिल रुग्णालयाची टीम अजून चाचण्या करणार आहे. 15 दिवसांपूर्वी बाळाची तब्येत बिघडल्याने त्यास रुग्णालयात दाखल केले गेले होते. बाळ काही दिवस व्हेंटिलेटरवरही होते. आता तपासणीअंती बाळाला एचएमपीव्ही विषाणूचा संसर्ग झाल्याचे सांगण्यात येत आहे.**



गुजरातच्या आरोग्य विभागाने सांगितले की, बाळाच्या चाचणीचा रिपोर्ट रुग्णालयाचा असून आमच्या लॅबमध्ये याचे परीक्षण करण्यात आले नाही. बाळाची प्रकृती आता स्थिर असून गुजरातच्या आरोग्य विभागाने एचएमपीवी विषाणूबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, राजस्थानमधील डुंगरपूर येथे राहणारे कुटुंब हे आपल्या 2 महिन्याच्या बाळासोबत अहमदाबादच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. कर्नाटकमध्ये भारतातील पहिले दोन रुग्ण सापडले होते. बंगळुरुच्या रुग्णालयात 3 महिन्यांच्या बाळाला ब्रॉन्कोप्न्यूमोनियामुळे दाखल करण्यात आले होते. नंतर त्या बाळावर एचएमपीवीचा उपचार करण्यात आला आता त्या बाळास डिस्चार्ज दिला गेला आहे. व्हायरसच्या संसर्गाची दुसरी केस कर्नाटकातच सापडली होती. बंगळुरुच्या रुग्णालयातच 8 महिन्याच्या बाळाला ब्रॉन्कोप्न्यूमोनियामुळे दाखल करण्यात आले आहे. या बाळावर सध्या उपचार सुरु असून त्याची प्रकृती सुधारत आहे.चीनमध्ये एचएमपीवी व्हायरसने हजारो लोकांना संक्रमित केले असून तेथील परिस्थिती दिवसेंदिवस नियंत्रणाबाहेर जात असून रुग्णालयाबाहेर रुग्णांची गर्दी होत आहे. एचएमपीवी व्हायरससंबंधी चीनकडून अद्याप कोणतीही विशेष माहिती देण्यात आलेली नाही. या व्हायरस संदर्भातील देशातील परिस्थितीबद्दल चीन बरेच काही लपवत आहे. या व्हायरसची लक्षणे ही कोरोना व्हायरस सारखी असल्याचे समोर आले आहे मात्र एचएमपीव्ही विषाणूची लागण झालेल्या रुग्णांमध्ये मृत्यूचे प्रमाण अजूनही नगण्य असल्याचे बोलले जात आहे. देशात आढळलेल्या रुग्णांनंतर भारत सरकार अलर्ट मोडवर आले असून आरोग्य विभागाने या व्हायरससंबंधी तातडीची बैठक बोलावली आहे.चीनमधूनच अनेक विषाणू पसरण्यामागचं प्रमुख कारण तिथली लोकसंख्येची घनता आहे. ही लोकसंख्या प्राण्यांच्या अनेक प्रजातींशी थेट संपर्कात येते. स्वच्छतेच्या बाबतीतही फारशी जागरुकता नसल्यानं महामारी पसरण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. चीनमध्ये ताज्या मांसाची विक्री जास्त होते. ताजं मांस बर्फात ठेवण्यात आलेल्या मांसापेक्षा जास्त स्वादिष्ट असल्याचं चिनी जनतेला वाटतं. उघड्यावर मांस कापलं जाणं अतिशय सर्वसामान्य बाब आहे. त्यामुळे विषाणू पसरण्याचा धोका असतो.गुजरातच्या आरोग्य विभागाने सांगितले की, बाळाच्या चाचणीचा रिपोर्ट रुग्णालयाचा असून आमच्या लॅबमध्ये याचे परीक्षण करण्यात आले नाही. बाळाची प्रकृती आता स्थिर असून गुजरातच्या आरोग्य विभागाने एचएमपीवी विषाणूबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, राजस्थानमधील डुंगरपूर येथे राहणारे कुटुंब हे आपल्या 2 महिन्याच्या बाळासोबत अहमदाबादच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

### 3 महिन्यांच्या बाळाला लागण

कर्नाटकमध्ये भारतातील पहिले दोन रुग्ण सापडले होते. बंगळुरुच्या रुग्णालयात 3 महिन्यांच्या बाळाला ब्रॉन्कोप्न्यूमोनियामुळे दाखल करण्यात आले होते. नंतर त्या बाळावर एचएमपीवीचा उपचार करण्यात आला आता त्या बाळास डिस्चार्ज दिला गेला आहे. व्हायरसच्या संसर्गाची दुसरी केस कर्नाटकातच सापडली होती. बंगळुरुच्या रुग्णालयातच 8 महिन्याच्या बाळाला ब्रॉन्कोप्न्यूमोनियामुळे दाखल करण्यात आले आहे. या बाळावर सध्या उपचार सुरु असून त्याची प्रकृती सुधारत आहे.चीनमध्ये एचएमपीवी व्हायरसने हजारो लोकांना संक्रमित केले असून तेथील परिस्थिती दिवसेंदिवस नियंत्रणाबाहेर जात असून रुग्णालयाबाहेर रुग्णांची गर्दी होत आहे. एचएमपीवी व्हायरससंबंधी चीनकडून अद्याप कोणतीही विशेष माहिती देण्यात आलेली नाही. या व्हायरस संदर्भातील देशातील परिस्थितीबद्दल चीन बरेच काही लपवत आहे. या व्हायरसची लक्षणे ही कोरोना व्हायरस सारखी असल्याचे समोर आले आहे मात्र एचएमपीव्ही विषाणूची लागण झालेल्या रुग्णांमध्ये मृत्यूचे प्रमाण अजूनही नगण्य असल्याचे बोलले जात आहे.

# छत्तीसगडच्या विजापूरमध्ये नक्षलवादी हल्ला!

## जवानांना घेऊन जाणाऱ्या वाहनावर नक्षलवाद्यांनी केला स्फोट

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्तीसगढमधील बीजापूरमध्ये नक्षलवाद्यांनी मोठा हल्ला केला आहे. जवानांना घेऊन जाणाऱ्या एका वाहनावर नक्षलवाद्यांनी स्फोट केला आहे. या हल्ल्यात नऊ जवान शहीद झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. सोमवारी ६ जानेवारी रोजी कुटरू भागात ही घटना घडली. नक्षल ऑपरेशन विवेकानंद सिन्हा यांनी दिलेल्या माहितीनुसार, नक्षलवाद्यांनी सोमवारी दुपारी २.१५ वाजता हा हल्ला केला.**




नक्षलवाद्यांनी ज्या सुरक्षा दलाच्या वाहनावर हल्ला केला, त्या वाहनात ९ पेक्षा अधिक जवान होते. सुरक्षा दलानीही त्या हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं.बस्तरच्या महानिरीक्षकांनी जवानांचं वाहन उडवल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. नक्षलवाद्यांच्या या हल्ल्यात सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नऊ जवान शहीद झाले आहेत. अलीकडच्या काळात आपल्या जवानांवर झालेला हा सर्वात मोठा हल्ला आहे. या हल्ल्यानंतर इतर ठिकाणांहून जवानांच्या तुकड्या घटनास्थळी पोहोचत आहेत. छत्तीसगडमधील विजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी जवानांना घेऊन जाणाऱ्या वाहनाचा स्फोट केला आहे. या हल्ल्यात 9 जवान शहीद झाले आहेत. या स्फोटात एका चालकाचाही मृत्यू झाला. बस्तर रेंजच्या आयजींनी स्फोटाला दुजोरा दिला आहे. बस्तर रेंजचे आयजी सुंदरराज पी यांनी सांगितले की, विजापूरमधील संयुक्त ऑपरेशन पार्टी ऑपरेशननंतर परतत होती. सोमवारी दुपारी 2.15 च्या सुमारास नक्षलवाद्यांनी आंबेली गावाजवळ आयईडी स्फोट घडवून आणला. स्फोट इतका भीषण होता की रस्त्यावर सुमारे 10 फूट खोल खड्डा तयार झाला आणि वाहनाचे तुकडे झाले.

### घटनेने संपूर्ण राज्य हादरलं

वाहनाचे काही भाग 30 फूट अंतरावर 25 फूट उंचीवर असलेल्या झाडावर आढळून आले. कुत्रु गाव विजापूर मुख्यालयापासून 40 किलोमीटर अंतरावर आहे. येथून काही अंतरावर असलेल्या आंबेली गावाजवळ हा स्फोट झाला. घटनास्थळी 10 ते 12 फूट खड्डा दिसत आहे. त्याचवेळी स्कॉर्पिओ गाडीचे पार्ट अस्ताव्यस्त झाले. स्कॉर्पिओ गाडीचा तुकडा 30 फूट अंतरावर असलेल्या झाडाला लटकलेला दिसला. बीजापूरमध्ये झालेल्या या घटनेने संपूर्ण राज्य हादरलं आहे.

# कंगना रणौत ते माजी पंतप्रधान इंदिरा गांधी



अभिनेत्री कंगना रणौत यांचा आगामी चित्रपट 'इमर्जन्सी' प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे. या चित्रपटाचा नवा ट्रेलर सोमवारी (६ जानेवारी २०२४ ला) प्रदर्शित करण्यात आला. काल (५ जानेवारी २०२४ ला) ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांनी या चित्रपटाशी संबंधित एक खास झलक चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. त्यांनी सोशल मीडियावर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे, ज्यामध्ये कंगना रणौत कशा प्रकारे प्रोस्थेटिक मेकअपच्या साहाय्याने माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासारख्या दिसू लागतात, हे दाखवले आहे. अनुपम खेर यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम हँडलवर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये कंगना रणौत मेकअप करताना दिसत आहेत. या चित्रपटात देशाच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भूमिका साकारत आहेत. या भूमिकेसाठी त्यांचा लूक प्रोस्थेटिक मेकअपच्या मदतीने तयार करण्यात आला आहे. कंगना रणौत या व्हिडीओमध्ये प्रोस्थेटिक मेकअप करणाऱ्या व्यक्तींशी दोन तीन मेकअपच्या सेटमधून कोणता प्रोस्थेटिक मेकअप चांगला दिसेल यावर चर्चा करताना दिसतात. यानंतर कंगना रणौत यांच्या चेहऱ्यावर मेकअप केला जातो. भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासारखे दिसण्यासाठी कंगना यांना डोक्यावर विग घालताना दाखवले आहे. मेकअप प्रक्रियेदरम्यान, त्या काही वेळातच इंदिरा गांधींसारख्या दिसू लागतात. अनुपम खेर यांनी कंगना रणौत यांचा हा व्हिडीओ शेअर करताना लिहिले, "शानदार! कंगना रणौत बनल्या भारताच्या सर्वात ताकदवान महिला – इंदिरा गांधी! ऑस्कर विजेते प्रोस्थेटिक आणि मेकअप आर्टिस्ट डीजे मालिनोव्स्की यांच्या कलेमुळे झालेला हा अद्भुत बदल नक्कीच प्रशंसेस पात्र आहे." हा व्हिडीओ सध्या इंटरनेटवर व्हायरल होत आहे.

# पुन्हा प्रदर्शित झाला दीपिकाचा रोमँटिक चित्रपट!



रणबीर कपूर आणि दीपिका पादुकोण यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'ये जवानी है दीवानी' चित्रपट ३१ मे २०१३ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला. या सिनेमातली गाणी असो किंवा संवाद सगळ्या गोष्टी आजही सिनेप्रेमींच्या अगदी तोंडपाठ आहेत. बाहेरगावी विविध देशांमध्ये फिरणं, पॅशन, करिअर या सगळ्यात बांधला गेलेला बनी आणि त्याची गाडी पुन्हा एकदा रुळावर आणणारी स्कॉलर नैना या दोघांची जुगलबंदी आपल्याला या चित्रपटात पाहायला मिळते.रणबीर-दीपिकाची पहिली भेट चित्रपटात मनालीला ट्रेकला जाताना होते. मुळात शांत आणि संयमी अशी नैना ( YJHD ) पहिल्यांदाच मित्रांबरोबर इतक्या दूरवर फिरायला जाते. यानंतर ती बनीच्या प्रेमात पडते. पण, त्याच्या आयुष्यातलं बाहेरगावी जाण्याचं ध्येय लक्षात घेऊन ती आपलं प्रेम व्यक्त करत नाही. यानंतर या दोघांची भेट पुन्हा एकदा काही वर्षांनी अदितीच्या लग्नात होते. या अदितीची भूमिका कल्कीने साकारलीये. तर, आदित्य रॉय कपूर चित्रपटात अवी या बनीच्या जवळच्या मित्राच्या भूमिकेत आहे.'ये जवानी है दीवानी' हा चित्रपट अनेकांसाठी आदर्श ठरला होता. यावरुन या सिनेमाची क्रेझ किती मोठ्या प्रमाणात आहे हे लक्षात येतं. या सिनेमाचं दिग्दर्शन अयान मुखर्जीने केलेलं आहे. तर, करण जोहरने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. धर्मा प्रोडक्शनने या नव्या वर्षात जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी 'ये जवानी है दीवानी' चित्रपट थिएटरमध्ये पुन्हा एकदा प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला. 'ये जवानी है दीवानी' २०१३ मध्ये ब्लॉकबस्टर ठरला होता. त्यामुळे पुन्हा प्रदर्शित झाल्यावर हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर काय जादू करणार याकडे सर्वांचं लक्ष होतं. अखेर करण जोहरने स्वत: पोस्ट शेअर करत रि-रिलीज झाल्यावर चित्रपटाचं किती कलेक्शन झालं याची आकडेवारी जाहीर केली आहे.

# सना खान दुसऱ्यांदा झाली आई

धर्मासाठी बॉलीवूड सोडणारी 'बिग बॉस' फेम अभिनेत्री सना खानने आनंदाची बातमी चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. सना खान दुसऱ्यांदा आई झाली आहे. सनाने इन्स्टाग्रामवर पोस्ट करून बाळाच्या जन्माची गुड न्यूज दिली आहे. सना खानला दीड वर्षांचा मोठा मुलगा आहे. त्यानंतर आता तिने दुसऱ्या बाळाला जन्म दिला आहे. सना खानने चार वर्षांपूर्वी २०२० मध्ये सुरतमधील मुफ्ती अनस सय्यदशी लग्न केलं. या जोडप्याने लग्नानंतर तीन वर्षांनी पहिल्या बाळाचं स्वागत केलं. त्यानंतर आता ते दुसऱ्यांदा आई-बाबा झाले आहेत. सनाला दुसरा मुलगा झाला आहे. सनाने इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओत तिने मुलाच्या जन्माबाबत माहिती दिली आहे.सना खानचा मोठा मुलगा दीड वर्षांचा आहे. जुलै २०२३ मध्ये तिने तिच्या पहिल्या बाळाचं स्वागत केलं होतं. आता सना दुसऱ्यांदा आई झाली आहे. सनाने काही महिन्यांपूर्वी एक पोस्ट करून ती दुसऱ्यांदा आई होणार असल्याची बातमी चाहत्यांबरोबर शेअर केली होती. आता सनाने तिच्या दुसऱ्या बाळाला जन्म दिला आहे. सनाला दुसरा मुलगा झाला आहे.



# गोल्डन ग्लोबचं स्वप्न भंगलं!

'आरआरआर' सिनेमातील 'नाटू नाटू' गाण्याला दोन वर्षांपूर्वी गोल्डन ग्लोब अवॉर्ड मिळाला होता. त्यानंतर यावर्षी 'ऑल वी इमॅजिन अॅज लाइट' या भारतीय चित्रपटाला प्रतिष्ठित गोल्डन ग्लोब अवॉर्ड्समध्ये नामांकन मिळालं होतं. 'नाटू नाटू'नंतर पुन्हा एकदा या चित्रपटामुळे गोल्डन ग्लोब भारतात येईल, अशी आशा होती. मात्र भारताचं हे स्वप्न भंगलं आहे. हॉलीवूडमधील अनेक मोठ्या चित्रपटांशी स्पर्धा केल्यानंतर पायल कपाडियाच्या 'ऑल वी इमॅजिन अॅज लाइट' नॉन-इंग्लिश फीचर कॅटेगरीतील सर्वोत्कृष्ट मोशन पिक्चरसाठी गोल्डन ग्लोब पुरस्कार गमावला आहे.

# गोविंदामुळे टीनाला बॉलीवूडमध्ये मिळाले नाही काम

गोविंदा हे ९० च्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक म्हणून ओळखले जातात. त्यांचा अभिनय व डान्स याची त्यांनी एक वेगळी स्टाइल निर्माण केली. आजही त्यांचे अनेक चित्रपट लोकप्रिय आहेत. याशिवाय त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळेदेखील ते व त्यांचे कुटुंब अनेकदा चर्चेत असलेले पाहायला मिळते. आता गोविंदा यांची पत्नी सुनिता आहुजाने एका मुलाखतीत त्यांची मुले टीना व यश यांच्या बॉलीवूडमधील करिअरबद्दल वक्तव्य केले आहे.लोकप्रिय अभिनेते गोविंदा यांची पत्नी सुनिता आहुजा स्पष्टवक्तेपणासाठी ओळखली जाते. नुकतीच तिने हिंदी रश या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी नेपोटिझम तसेच इंडस्ट्रीमध्ये त्यांची मुलगी काम करणार का, याविषयी वक्तव्य केले आहे. या मुलाखतीत सुनिता आहुजाने म्हटले, "तिला चांगला प्रतिसाद मिळत होता, पण सगळ्यांनी असे एक भीतीचे वातावरण तयार केले की जर टीना काम करत असेल तर गोविंदासुद्धा सेटवर येतील आणि ते कडक शिस्तीचे वडील असल्यामुळे इतर लोकांना बोलतील, शिवीगाळ करतील. मला कळत नाही, लोक अशाप्रकारच्या खोट्या गोष्टी का तयार करतात? ती चांगल्या भूमिकेची वाट बघत आहे. घर चालवण्यासाठी तिला संघर्ष करायची गरज नाही. जर तिला चांगली संधी मिळाली तर ती का काम करणार नाही? तुम्ही तिला संधी तरी द्या."याबरोबरच सुनिता आहुजाने बॉलीवूडमधील नेपोटिझमवर टीका केली. विशिष्ट कलाकारांच्या मुलांना काम मिळते.

# रशीद खानची सर्वोत्कृष्ट गोलंदाजी!

## 11 विकेट्स घेत मिळवून दिला मालिका विजय

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रशीद खानने आपल्या फिरकीच्या जोरावर मोठमोठ्या खेळाडूंना नमवत संघाला दणदणीत विजय मिळवून दिले आहेत. आता त्याने हिच कामगिरी झिम्बाब्वेविरूद्धच्या कसोटी सामन्यात करत संघाच्या मालिका विजयात मोठी भूमिका बजावली आहे. रशीद खानने झिम्बाब्वेविरूद्धच्या कसोटी सामन्यात ११ विकेट घेत नवा विक्रम नावे केला आहे.**




अफगाणिस्तान वि झिम्बाब्वे या संघांमध्ये दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात होती. या दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये वेगळाच रोमांच अनुभवायला मिळाला. दुसऱ्या कसोटी सामन्यातील दुसऱ्या डावात रशीद खानने ७ विकेट्स घेतल्या. मात्र, याआधीही रशीदने सुमारे तीन वर्षांपूर्वी हा पराक्रम केला होता. मात्र यावेळी त्याने खूपच कमी धावा दिल्या आहेत. याआधी २०२१ मध्ये अफगाणिस्तान आणि बांगलादेश यांच्यात अबुधाबीमध्ये कसोटी सामना खेळला गेला होता, तेव्हा रशीद खानने १३७ धावा देत ७ विकेट्स घेतले होते.रशीद खानने दुसऱ्या कसोटीत झिम्बाब्वेविरूद्ध एका डावात ७ विकेट्स घेत फक्त ६६ धावा दिल्या. याआधीही अफगाणिस्तानच्या नावावर कसोटीत सर्वोत्तम गोलंदाजीचा विक्रम होता, तो आजही त्यांच्या नावावर आहे. पण आता अफगाणिस्तानने हा विक्रम अधिक मजबूत केला आहे.आतापर्यंत अफगाणिस्तानने कसोटीत फक्त दोन वेळा एका डावात सात विकेट्स घेतल्या आहेत आणि रशीद खानने दोन्ही वेळा ही कामगिरी केली आहे. याशिवाय रशीद खानने २०१९ मध्ये बांगलादेशविरुद्ध ४९ धावांत ६ विकेट्स घेतल्या होत्या. २०२१ मध्ये अफगाणिस्तानच्या आमीर हमलाने झिम्बाब्वेविरुद्ध ७५ धावांत ६ विकेट घेतले होते. रशीद खानने कसोटीत केवळ ५५ धावा देत ५ विकेट घेण्याचा विक्रमही केला आहे. त्याने २०१९ मध्ये बांगलादेशविरुद्ध ही कामगिरी केली होती.

अफगाणिस्तानने दुसऱ्या कसोटी सामन्यात प्रथम फलंदाजी करताना केवळ १५७ धावा केल्या. यानंतर झिम्बाब्वेने प्रत्युत्तरात २४३ धावा नोंदवल्या आणि पहिल्या डावाच्या जोरावर आघाडी घेतली. पण अफगाणिस्तानच्या रहमत शाहने १३९ धावांची आणि इस्मात अलाम यामे १०१ धावांची खेळी करत संघाची धावसंख्या ३६३ वर नेऊन ठेवली. यानंतर रशीद खानच्या जादुई गोलंदाजीच्या जोरावर अफगाणिस्तानने झिम्बाब्वेवर कसोटीत मालिका विजय मिळवला.अफगाणिस्तान वि झिम्बाब्वे या संघांमध्ये दोन

### 49 धावांत 6 विकेट्स घेतल्या

आतापर्यंत अफगाणिस्तानने कसोटीत फक्त दोन वेळा एका डावात सात विकेट्स घेतल्या आहेत आणि रशीद खानने दोन्ही वेळा ही कामगिरी केली आहे. याशिवाय रशीद खानने २०१९ मध्ये बांगलादेशविरुद्ध ४९ धावांत ६ विकेट्स घेतल्या होत्या. २०२१ मध्ये अफगाणिस्तानच्या आमीर हमलाने झिम्बाब्वेविरुद्ध ७५ धावांत ६ विकेट घेतले होते. रशीद खानने कसोटीत केवळ ५५ धावा देत ५ विकेट घेण्याचा विक्रमही केला आहे. त्याने २०१९ मध्ये बांगलादेशविरुद्ध ही कामगिरी केली होती.अफगाणिस्तानने दुसऱ्या कसोटी सामन्यात प्रथम फलंदाजी करताना केवळ १५७ धावा केल्या. यानंतर झिम्बाब्वेने प्रत्युत्तरात २४३ धावा नोंदवल्या आणि पहिल्या डावाच्या जोरावर आघाडी घेतली. पण अफगाणिस्तानच्या रहमत शाहने १३९ धावांची आणि इस्मात अलाम यामे १०१ धावांची खेळी करत संघाची धावसंख्या ३६३ वर नेऊन ठेवली.जादुई गोलंदाजीच्या जोरावर अफगाणिस्तानने झिम्बाब्वेवर कसोटीत मालिका विजय मिळवला.

सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात होती.

या दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये वेगळाच रोमांच अनुभवायला मिळाला. दुसऱ्या कसोटी सामन्यातील दुसऱ्या डावात रशीद खानने ७ विकेट्स घेतल्या. मात्र, याआधीही रशीदने सुमारे तीन वर्षांपूर्वी हा पराक्रम केला होता. मात्र यावेळी त्याने खूपच कमी धावा दिल्या आहेत. याआधी २०२१ मध्ये अफगाणिस्तान आणि बांगलादेश यांच्यात अबुधाबीमध्ये कसोटी सामना खेळला गेला होता, तेव्हा रशीद खानने १३७ धावा देत ७ विकेट्स घेतले होते.रशीद खानने दुसऱ्या कसोटीत झिम्बाब्वेविरूद्ध एका डावात ७ विकेट्स घेत फक्त ६६ धावा दिल्या. याआधीही अफगाणिस्तानच्या नावावर कसोटीत सर्वोत्तम गोलंदाजीचा विक्रम होता, तो आजही त्यांच्या नावावर आहे. पण आता अफगाणिस्तानने हा विक्रम अधिक मजबूत केला आहे.

# रोहित शर्माचं कॉमेडीमध्ये भविष्य चांगलं

## भारतीय कर्णधाराबाबत माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूचं वादग्रस्त वक्तव्य

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बॉर्डर गावस्कर ट्रॉफी ही भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मासाठी फार काही चांगली ठरली नाही. रोहित शर्मा ऑस्ट्रेलिया विरूद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत एकदाही दुहेरी आकडा गाठू शकला नाही. या दौऱ्यात रोहित शर्माने ५ कसोटी डावात फक्त ३१ धावा केल्या. यानंतर रोहित शर्माने सिडनी कसोटीत विश्रांतीचा निर्णय घेतला आणल्या सामन्यात रोहित खेळला नाही.**



रोहितच्या या निर्णयानंतर त्याच्या कसोटी कारकिर्दीची सांगता झाल्याची चर्चा रंगली. पण सिडनी कसोटीच्या दुसऱ्या दिवशीच रोहित शर्माने मुलाखत देत तो निवृत्त होत नसल्याचे सांगितले. यानंतर ऑस्ट्रेलियाच्या माजी क्रिकेटपटूने रोहित शर्मावर मोठं वक्तव्य केलं आहे. ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाचा माजी सलामीवीर सायमन कॅटिचने रोहित शर्माला इशारा दिला की, कसोटी क्रिकेटमध्ये त्याचा फॉर्म परत मिळवण्यासाठी इंग्लंडमध्ये खेळणं हे सोपं ठिकाण नसेल. तो म्हणाला की, भारतीय कर्णधाराला आता कसोटी क्रिकेटमध्ये आपले भविष्य काय आहे हे चांगलेच कळलं असेल. कॅटिच म्हणाले की रोहितची गेल्या सहा महिन्यांतील कसोटीतील आकडेवारी चांगली नाही आणि कसोटी क्रिकेटमध्ये सलामी देणं आता ३७ वर्षीय खेळाडूसाठी आदर्श नाही.कॅटिच स्टार स्पोर्ट्शी बोलताना म्हणाले की,"रोहितची आकडेवारी पाहिली तर ती खूप निंदनीय आहे आणि ते या कसोटीतही पाहायला मिळाले. सिडनी कसोटीत न खेळण्याचा निर्णय घेणं हा त्याचा खूपच निस्वार्थी निर्णय होता."

### रोहितची विनोद बुद्धी खूपच चांगली

"मी रोहितची मुलाखत पाहिली, तो खूप चांगला बोलला आहे. क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर तो भविष्यात स्टॅन्ड अप कॉमेडी करू शकतो, कारण त्याची विनोद बुद्धी खूपच चांगली आहे."सिडनी कसोटीच्या दुसऱ्या दिवशीच्या लंच ब्रेकमध्ये रोहित शर्माने स्टार स्पोर्ट्शी संवाद साधला. रोहित शर्माने सिडनी कसोटीत विश्रांती घेण्याचा त्याचा निर्णय हा संघासाठी त्याने घेतला होता आणि तो कसोटीतून निवृत्त होणार नसल्याचे त्याने स्पष्ट सांगितले. भारतीय संघ आता थेट जूनमध्ये कसोटी क्रिकेट खेळणार आहे.